महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४२९ दिनांक १० / ०९ / २०१२

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५.

संदर्भ : महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग ४-अ, दिनांक २०.०१.२०१२.

.....

श्री.नंदकुमार जंत्रे, शासनाचे सचिव यांचेकडून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ दिनांक २०.०१.२०१२ योग्य त्या कार्यवाहीसाठी या कक्षास प्राप्त झाले आहे.

२. या अधिसूचनेद्वारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करून नियम क्र.३ नंतर नियम ३-क समाविष्ट करण्यात आला आहे. सदर नियम क्र.३-क अनुसार माहिती मिळणेबाबतचा एक विनंती अर्ज केवळ एकाच विषयाशी संबंधित असावा आणि त्यात सर्व साधारणपणे दीडशेपेक्षा अधीक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर तो त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील. सदरच्या अधिसूचनेची प्रत विस्तृत माहितीसाठी सोबत जोडली आहे.

३. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त अधिसूचनेचे अवलोकन करून समाविष्ट करण्यात आलेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

सही/-
**( संदेश ए. हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc*
*06/09/2012*

RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/SOUTH-322/2010-12

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ६९] शुक्रवार, जानेवारी २०, २०१२/पौष ३०, शके १९३३ [पृष्ठे ३
किंमत : रुपये १४.००

## असाधारण क्रमांक ७

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जानेवारी २०१२

### अधिसूचना

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक केमाअ. २००९/प्र.क्र. ३९८/०९/सहा.—माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या २७ कलम, पोट-कलमे (१) आणि (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ याच्या नियम ३ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" **३क. एक विनंती अर्ज केवळ एका विषयाशी संबंधित असणे.**—अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा आणि त्यात सर्वसाधारणपणे दीडशेपेक्षा अधिक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर तो त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील :

परंतु, एकापेक्षा अधिक विषयांशी संबंधित विनंती अर्ज केला असेल अशा प्रकरणी, जन माहिती अधिकारी, केवळ पहिल्या विषयाशी संबंधित विनंतीबद्दलच माहिती देईल आणि इतर प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र विनंती अर्ज करण्याचा सल्ला, अर्जदाराला देईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नंदकुमार जंत्रे,**
शासनाचे सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 16th January 2012.

*NOTIFICATION*

RIGHT TO INFORMATION ACT, 2005.

No. CRTI./2009/C.R.398/09/VI.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 27 of the Right to Information Act, 2005 (22 of 2005), the Government of Maharashtra hereby please to make the following rules further to amend the Maharashtra Right to Information Rules, 2005, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Right to Information (Amendment) Rules, 2012.

2. After rule 3 of the Maharashtra Right to Information Rules, 2005, the following rule shall be inserted, namely :—

"3A. *Request relate only to single subject matter.*—A request in writing for information under section 6 of the Act shall relate to one subject matter and it shall not ordinarily exceed one hundred and fifty words, If an applicant wishes to seek information on more than one subject matter, he shall make separate applications :

Provided that, in case the request made relates to more than one subject matter, the Public Information Officer may respond to the request relating to the first subject matter only and may advice the applicant to make a separate application for each of the other subject matters."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NANDKUMAR JANTRE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.